RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक २८]　　सोमवार, मे २९, २०१७/ज्येष्ठ ८, शके १९३९　　[पृष्ठे ६, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ५५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.—** वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे जकात व स्थानिक संस्था कर रद्द केल्याने होणाऱ्या महसुलाच्या हानीबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेला आणि इतर स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम ... ... ... ...　　पृष्ठे

दिनांक २८ मे २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**<br>
प्रधान सचिव,<br>
महाराष्ट्र शासन.<br>
विधि व न्याय विभाग

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २९ मे २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे जकात व स्थानिक संस्था कर रद्द केल्याने होणाऱ्या महसुलाच्या हानीबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेला आणि इतर स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे जकात व स्थानिक संस्था कर रद्द केल्याने होणाऱ्या महसुलाच्या हानीबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेला आणि इतर स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " नियत दिनांक " याचा अर्थ, ज्या दिनांकास महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ अंमलात येईल तो दिनांक, असा आहे ; २०१७ चा महा.

(ख) " आधार वर्ष " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेले वर्ष, असा आहे ;

(ग) " आधार वर्ष महसूल " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे स्थानिक प्राधिकरणांनी वसूल केलेला महसूल, असा आहे ;

(घ) " भरपाई " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ८ अन्वये निर्धारित केलेली रक्कम, असा आहे ;

(ङ) " वस्तू व सेवा कर अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७, असा आहे ; २०१७ चा महा.

(च) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली स्थानिक प्राधिकरणे, असा आहे ;

(छ) " प्रस्तावित वाढीचा दर " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ नुसार प्रस्तावित वाढीचा दर, असा आहे ;

(ज) " प्रस्तावित महसूल " याचा अर्थ, अधिनियमाची कलमे ६ व ७ यांनुसार परिगणना केलेला महसूल, असा आहे ;

(झ) " अनुसूची " याचा अर्थ, अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले आणि व्याख्या न केलेले परंतु, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील. २०१७ चा महा.

प्रस्तावित वाढीचा दर. **३.** एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकरिता महसुलाच्या प्रस्तावित वाढीचा नाममात्र दर हा, शाश्वत, चक्रवाढ पद्धतीने प्रतिवर्षे ८ टक्के इतका असेल.

आधार वर्ष. **४.** एखाद्या स्थानिक प्राधिकरणाला कोणत्याही वित्तीय वर्षात देय असलेल्या भरपाईच्या रकमेची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, ३१ मार्च २०१७ रोजी संपणारे वित्तीय वर्ष हे, आधार वर्ष म्हणून विचारात घेण्यात येईल.

आधार वर्ष महसूल. **५.** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचा आधार वर्ष महसूल हा, संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या तरतुदी अंमलात येण्यापूर्वी, लागू असल्याप्रमाणे, भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीच्या सूची-दोन मधील (राज्य सूची) पूर्वीच्या नोंद ५२ अन्वये, आकारण्यात व वसूल करण्यात येणाऱ्या जकातीच्या संबंधात, त्या आधार वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिकेने, परतावा वजा जाता, वसूल केलेला महसूल असेल.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेखेरीज, एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा आधार वर्ष महसूल हा, संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या तरतुदी अंमलात येण्यापूर्वी, लागू असल्याप्रमाणे, भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीच्या सूची-दोन मधील (राज्य सूची) पूर्वीच्या नोंद ५२ अन्वये, आकारण्यात व वसूल करण्यात येणारा प्रवेश कर, जकात, स्थानिक संस्था कर, उपकर किंवा इतर कोणताही कर यांच्या संबंधात, त्या आधार वर्षाचा, परतावा वजा जाता, महसूल असेल :

परंतु, स्थानिक प्राधिकरण, ३१ मार्च २०१६ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षानंतर अधिसूचित केले असेल तेव्हा, त्या स्थानिक प्राधिकरणाचा आधार वर्ष महसूल हा, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, १ ऑगस्ट २०१५ पासून प्रति वर्ष ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी उलाढाल असलेल्या आयातदाराच्या संबंधातील स्थानिक संस्था कर रद्द केल्याच्या कारणापोटी स्थानिक प्राधिकरण जी रक्कम मिळण्यास पात्र असेल ती रक्कम आधार वर्ष महसुलाचा भाग असेल.

(३) या कलमाच्या प्रयोजनासाठी, आधार वर्ष महसुल हा, राज्याच्या स्थानिक निधी लेखापरीक्षेद्वारे केलेल्या लेखापरीक्षेप्रमाणे असेल.

पहिल्या वर्षाचा प्रस्तावित महसूल.

**६.** एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या पहिल्या वर्षाच्या कालावधीचा प्रस्तावित महसुल हा, कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, नियत दिनांकापर्यंत, परतावा वजा जाता, महसुलाची वसूल केलेली रक्कम वजा करून, त्या स्थानिक प्राधिकरणाच्या आधार वर्ष महसुलास प्रस्तावित वाढीचा दर लागू करून परिगणित करण्यात येईल.

इतर कोणत्याही वर्षाचा प्रस्तावित महसूल.

**७.** पहिले वर्ष वगळता, एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही वर्षाचा प्रस्तावित महसूल हा, कलम ३ नुसार चक्रवाढ दराचे तत्त्व लागू करून, परतावा वजा जाता, त्या स्थानिक प्राधिकरणाच्या आधार वर्ष महसुलास प्रस्तावित वाढीचा दर लागू करून परिगणित करण्यात येईल.

**उदाहरण.—**संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा कलम ५ नुसार परिगणना केलेला २०१६-२०१७ चा आधारवर्ष महसूल हा २०० रुपये इतका असेल तेव्हा, २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाचा प्रस्तावित महसूल, पुढीलप्रमाणे काढता येईल :—

$$\text{२०१८-२०१९ चा प्रस्तावित महसूल} = २०० \left(१ + \frac{८}{१००}\right)^{२}$$

भरपाईची परिगणना करणे व ती देणे.

**८.** (१) एखाद्या स्थानिक संस्थेला देय असलेल्या भरपाईची, मासिक तत्त्वावर तात्पुरती परिगणना करण्यात येईल व ती देण्यात येईल आणि ती, स्थानिक निधी लेखा लेखापरीक्षेद्वारे केलेल्या लेखापरीक्षेप्रमाणे, महसुलाची अंतिम आकडेवारी मिळाल्यानंतर, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी अंतिमतः परिगणित करण्यात येईल.

(२) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला कोणत्याही वित्तीय वर्षाची देय असलेली एकूण भरपाईची रक्कम, पुढील प्रमाणे परिगणित करण्यात येईल :—

(क) एखाद्या स्थानिक प्राधिकरणाला कोणत्याही वित्तीय वर्षाची प्रस्तावित महसुलाची रक्कम, कलम ६ किंवा, यथास्थिति, कलम ७ प्रमाणे परिगणित करण्यात येईल.

(ख) स्थानिक प्राधिकरणाला प्रोद्भूत होणारा महसूल परिगणित करण्यात येईल आणि तो, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर राज्य शासनाकडून स्थानिक प्राधिकरणाला अभिहस्तांकित करण्यात आलेले कर, फी किंवा महसुलाचे अन्य स्रोत यापोटी प्रोद्भूत होणारा महसूल, आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी राज्य शासनाकडून स्थानिक प्राधिकरणाला अभिहस्तांकित करण्यात आलेल्या कराचे वाढीव दर आणि फीची रक्कम किंवा दरातील वाढ किंवा महसुलाच्या स्रोताची इतर साधने यापोटी प्रोद्भूत होणारा महसूल असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या स्थानिक प्राधिकरणाला प्रोद्भूत होणारी महसुलाची रक्कम याचा अर्थ, कर, फी किंवा महसुलाचा अन्य स्रोत त्या स्थानिक प्राधिकरणाला अभिहस्तांकित करण्यात आले नसते तर, त्यापोटी जो महसूल राज्य शासन त्या स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातून वसूल करू शकले असते आणि याबाबत राज्याने महसुलाची अशी रक्कम विनिर्दिष्ट केली असती, अशी महसुलाची रक्कम, असा आहे.

(ग) कोणत्याही वित्तीय वर्षात देय असलेली एकूण भरपाईची रक्कम ही, त्या वित्तीय वर्षाच्या प्रस्तावित महसुलाची रक्कम आणि खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्या वर्षाची स्थानिक प्राधिकरणाला प्रोद्भूत होणारी महसुलाची रक्कम यांमधील फरकाची रक्कम असेल.

## उदाहरण

**एक. पहिले वर्ष**

| | |
|---|---|
| २०१६-२०१७ या वर्षाचा आधार वर्ष महसूल | १०० |
| २०१७-१८ या वर्षाचा प्रस्तावित महसूल, म्हणजेच ८ टक्के वाढ | १०८.०० |
| वजा या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या दिनांकापर्यंत, म्हणजेच उदा. १ एप्रिल २०१७ ते ३० जून २०१७ पर्यंत, वसूल केलेली स्थानिक संस्था कराची/ जकातीची रक्कम. | २०.०० |
| वजा दिनांक १ जुलै २०१७ पासून दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी नेमून दिलेला प्रोद्‌भूत महसूल | २०.०० |
| देय असलेली भरपाई | ६८.०० |

**दोन. नंतरचे वर्ष**

| | |
|---|---|
| २०१६-१७ या वर्षाचा आधार वर्ष महसूल | १०० |
| २०१८-१९ या वर्षाचा प्रस्तावित महसूल, म्हणजेच ८ टक्के दराने होणारी वाढ. | ११६.६४ |
| वजा नेमून दिलेला प्रोद्‌भूत महसूल | ३०.०० |
| देय असलेली भरपाई | ८६.६४ |

(३) एखाद्या स्थानिक प्राधिकरणाची कोणत्याही वर्षातील प्रत्येक महिन्याच्या अखेरीस असलेली महसुलाच्या हानीची रक्कम, पुढीलप्रमाणे परिगणित करण्यात येईल :—

(क) संबंधित वित्तीय वर्षाच्या मासिक कालावधीची ते स्थानिक प्राधिकरण प्राप्त करू शकले असते अशा प्रस्तावित महसुलाची रक्कम, कलम ६ किंवा कलम ७ नुसार परिगणना केलेल्या कोणत्याही वित्तीय वर्षाच्या एकूण प्रस्तावित महसुलाच्या रकमेच्या टक्केवारीनुसार यथाप्रमाण तत्त्वावर परिगणित होईल.

**उदाहरण.**—कलम ६ किंवा ७ नुसार परिगणना केलेल्या कोणत्याही वर्षाचा प्रस्तावित महसूल हा, रक्कम रुपये १०० इतका असेल तेव्हा, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ मासिक कालावधीचा प्राप्त होऊ शकला असता असा प्रस्तावित महसूल हा, $१००\times\frac{१}{१२}=$ रुपये ०८.३३ इतका असेल.

(ख) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला नियत दिनांकापासून प्रत्येक तीन महिन्यांच्या कालावधीसाठी देय असलेली तात्पुरती भरपाईची रक्कम, कोणत्याही वित्तीय वर्षातील संबद्ध महिन्याच्या पाचव्या दिवशी किंवा त्यापूर्वी, आगाऊ देण्यात येईल आणि ती रक्कम, खंड (क) मध्ये परिगणित केल्याप्रमाणे असेल. अशा प्रकारे देय असलेली भरपाईची तात्पुरती रक्कम, प्रत्येक महिन्याच्या पाचव्या दिवशी किंवा त्यापूर्वी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यासाठी नेमून दिलेल्या बँक खात्यात आगाऊ जमा करण्यात येईल आणि अशी रक्कम जमा करण्यात कसूर झाल्यास, राज्य शासनाने द्यावयाच्या हमीच्या आधारे त्या महिन्याकरिता देय असलेली भरपाईची रक्कम, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खात्यात जमा करण्यासाठी, नेमून दिलेल्या बँकेस प्राधिकृत करण्यात येईल.

(ग) प्रत्येक चौथ्या महिन्यात, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला देय असलेली तात्पुरती भरपाईची रक्कम ही, त्या चौथ्या महिन्याचा प्रस्तावित महसूल आणि आधीच्या तीन महिन्याच्या कालावधीत त्या स्थानिक प्राधिकरणाला प्रोद्‌भूत होणारा महसूल यांमधील फरकाची रक्कम असेल :

परंतु, आधीच्या तीन महिन्यांच्या कालावधीत स्थानिक प्राधिकरणाला प्रोद्‌भूत होणारी महसुलाची रक्कम, चौथ्या महिन्यात देय असलेल्या तात्पुरत्या भरपाईच्या रकमेपेक्षा अधिक असेल तेव्हा, ती अधिक रक्कम, पाचव्या महिन्याच्या आणि त्या पुढच्या महिन्याच्या, अशाप्रकारे देय असलेल्या भरपाईच्या रकमेतून वजा करण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार परिगणना केलेली, स्थानिक प्राधिकरणाला देय असलेली अंतिम भरपाईची रक्कम आणि पोट-कलम (३) नुसार उक्त वित्तीय वर्षात स्थानिक प्राधिकरणाला दिलेली तात्पुरती भरपाईची एकूण रक्कम यांमधील कोणतीही फरकाची रक्कम असल्यास, ती फरकाची रक्कम, नंतरच्या वित्तीय वर्षात त्या स्थानिक प्राधिकरणाला देण्यात येणाऱ्या भरपाईच्या रकमेतून, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने, समायोजित करण्यात येईल.

**९.** राज्य शासनास, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीतील कोणत्याही नोंदीमध्ये भर घालून किंवा तीमध्ये फेरबदल करून किंवा ती नोंद वगळून त्या अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि त्यानंतर, त्या अनुसूचीत तद्नुसार, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून सुधारणा होईल. अनुसूचीची सुधारणा.

**१०.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही तरतुदीला बाध न येता, या अधिनियमान्वये करण्यात येणारा कोणताही नियम, नियत दिवसाच्या आधीचा नसेल अशा कोणत्याही दिनांकापासून भूतलक्षी ठरेल अशा प्रकारे, करता येईल.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत मिळून, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती झाली किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती झाली आणि ते तशा आशयाचा आपला निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमांन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**११.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांकरिता त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## अनुसूची

[ कलमे २(१)(झ) आणि ९ पहा ]

(१) अहमदनगर महानगरपालिका

(२) अमरावती महानगरपालिका

(३) औरंगाबाद महानगरपालिका

(४) अकोला महानगरपालिका

(५) भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

(६) चंद्रपूर महानगरपालिका

(७) धुळे महानगरपालिका

(८) जळगाव महानगरपालिका

(९) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

(१०) कोल्हापूर महानगरपालिका

(११) लातूर महानगरपालिका

(१२) बृहन्मुंबई महानगरपालिका

(१३) मिरा-भाईंदर महानगरपालिका

(१४) मालेगाव महानगरपालिका

(१५) नवी मुंबई महानगरपालिका

(१६) नाशिक महानगरपालिका

(१७) नागपूर महानगरपालिका

(१८) नांदेड-वाघाळा महानगरपालिका

(१९) पुणे महानगरपालिका

(२०) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

(२१) परभणी महानगरपालिका

(२२) पनवेल महानगरपालिका

(२३) सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका

(२४) सोलापूर महानगरपालिका

(२५) ठाणे महानगरपालिका

(२६) उल्हासनगर महानगरपालिका

(२७) वसई-विरार महानगरपालिका

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.